## अ) गाथा सप्तशती:

गाथा सप्तशती हा गोदावरी खोऱ्यातील ७०० लोकगीतांचा एक संग्रह आहे. 'हाल' या सातवाहन राजानेही लोकलन करून हा ग्रंथ सिद्ध केलेला आहे. गीत प्रतिष्ठान (आनाची राजधानी होती. मात्र हाल ला ग्रामीण भागात भटकंती करण्याची हौस होती. उत्तम निरिक्षण, चौकसबुध्दी आणि ऐकण्याची वृत्ती यातून त्याने अनेक लोकगीत मिळवली. यातूनच, त्याने, अशा लोक गीतांचे संकलन केले... आणि 'गाथासप्तशती' नावाने हा ग्रंथ लिहिला.

हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृत या भाषेत लिहिलेला आहे. त्यावेळी संस्कृत ही राजभाषा होती तशीच धर्माचीही भाषा होती. मात्र सातवाहनांनी आवर्जून बोली भाषेला महाराष्ट्री प्राकृतला महत्व दिलेले होते. सामान्य- जनाचीही भाषा होती. त्यामुळेच हाल ने, याच भाषेत हा ग्रंथ रचलेला आहे. सातवाहनकालीन ग्रामीण भागाचे अस्सल दर्शन घडवून देणारा हा ग्रंथ आहे.

या ग्रंथातून आपल्याला, या काळातील गोदाखोऱ्याची भौगोलिक तशीच पर्यावरणाची स्थिती कळून येते. यात विविध पर्वत, नद्या, वनस्पती, फुले, प्राणी यांची माहिती मिळते. त्याचप्रमाणे ग्रामीण समाज जीवनाचाही परिचय होतो. किंबहुना, त्याकाळातील ग्रामीण समाज जीवनावर प्रकाश टाकणारा हा महत्वाचा ग्रंथ आहे असे म्हणता येईल. तसेच, कुटुंबव्यवस्था आणि त्यातील चित्र-विचित्र नातेसबंध कळून येतात. विविध नात्यातील ताण-तणाव दिसून येतात. एका बाजूला नैतिक मूल्यांचे पालन दिसून येते आणि त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला व्याभिचाराची ही उदाहरणे दिसून येतात.

त्याकाळातील विविध उपजीविकेचे मार्ग कळून येतात. शेती, पशुपालन, मासेमारी, शिकार, अन्न संकलन असे वैविध्यपूर्ण मार्ग त्याकाळातील लोक हाताळत असत. त्यामुळेच यांच्या आहारात वैविध्य दिसून येते. त्याचप्रमाणे हे लोक विविध वस्तूंच्या कारागीरीमध्ये गुंतलेले होते हे कळून येते. या ग्रंथातून त्याकाळातील व्यापार आणि दळणवळणाच्या सुविधाही दिसून येतात.

त्याचप्रमाणे, या लोकांच्या विविध प्रकारच्या वेशभूषा आणि केशभूषा याबाबतही आपल्याला माहिती मिळते. विविध अलंकारांची माहिती मिळते. त्यांचे छद कळून येतात. करमणूकीची साधने लक्षात येतात. एकदर हे लोक सुखी आणि आनंदी होते हे आपल्याला लक्षात येते.

त्याकाळातील संस्कृत भाषेतील ग्रंथ आपल्याला तत्कालिन धर्माच्या अपेक्षा दर्शवितात. शिलालेख, राजांचे पराक्रम आणि कर्तृत्व सांगतात. मात्र 'गाथा सप्तशती' हा ग्रंथ त्याकाळातील ग्रामीण सामान्य माणसाबद्दल बोलतो; त्यांची माहिती देतो. म्हणून, हे एक महत्वाचे साधन आहे असे म्हणता येईल.

## ब) पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियन सी

या ग्रंथाचे 'तांबड्या समुद्रातील एक खलाशी' असे भाषांतर करता येईल. हा ग्रंथ कुणी लिहिला है। आपल्याला माहिती नाही.
इतिहास हा विविध साधनांच्या म्हणजेच पुराव्याच्या आधारे लिहावा लागतो. विविध प्रकारांची साधने उपलब्ध असतात. यातील 'परकिय वृत्तांत' हा साधनांचा एक महत्वाचा प्रकार आहे. विविध कारणासाठी परकियांनी भारताला भेटी दिल्या. काही काळ त्यांनी येथे वास्तव्य केले. भटकंती केली. चौकसवृत्तीने निरिक्षण केले. काहींनी नोंदी केल्या. पुढे ते आपल्या मायभूमीला परत गेले. तिथे त्यांनी आपल्या त्या प्रवासाचा वृत्तात लिहिला. याना 'परकिय वृत्तात असे म्हटले जाते. हे लोक, भारतात कुणाच्या आश्रयाला स आश्रयदात्यांचे कौतुक करण्याची सक्ती त्याच्यावर नव्हती. कुणाशी ते संबंधीतही नव्हते. थोडक्यात, त्याचे कोणतेही हितसंबंध भारतात गुंतलेले नव्हते. त्यामुळे त्याचे निरिक्षण आणि त्यांचा वृत्तांत हा निरपेक्ष असतो; तटस्थ असतो. म्हणूनच, अशा परकियांचे वृत्तांत हे एकप्रकारे इतिहासाचे वस्तुनिष्ठ साधन असते. म्हणून त्यांना मूल्य आहे.अर्थात, ते मूळात भारतीय नसल्याने; भारतातील परपरा, श्रध्दा, गुंतागुंतीचे समाजजीवन याबाबत त्यांना सखोल माहिती नसते. त्यात, ते, त्यांच्या दृष्टिकोनातून किंवा पूर्वग्रहातून भारताकडे पाहत असतात. त्यामुळे ते आपल्या वृत्तांतात काही मोठे घोळही करून ठेवू शकतात. ही या वृत्तांताची मर्यादाही आहे.

'पेरिप्लस' हे असेच एक महत्वाचे साधन आहे. यातून, आपल्याला, त्याकाळातील भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी अत्यंत वस्तुनिष्ठ आणि मोलाची माहिती मिळते.

त्याकाळात, भारतातील देशावरील उत्पादन केंद्र ही एकमेकाना जोडलेली असत. यातून अंतर्गत व्यापार होत असे. पुढे ही केंद्र, सह्याद्रीच्या घाटमार्गाने, पुढे, सागर किनाऱ्यांवरील बंदरांना जोडलेली असत. आणि पुढे, ही बदरे, परदेशी बंदराना (आणि तेथून त्यांच्या देशावरील केंद्रांना) जोडलेली असत. यातून आंतरराष्ट्रीय व्यापार होत असे.अशा उद्योग-व्यापारातील जाळयातील सर्व केंद्राची नावे

आपल्याला पेरिप्लस' मधून माहिती होतात. न्या ठिकाणी कोणत्या वस्तूंचे उत्पादन होत होते, कोणत्या बंदरातून कोणत्या वस्तूंचा व्यापार होत असे यांची माहिती मिळते. तसेच, प्रत्येक केंद्रांतील अंतर काय होतेही सुध्दा मोलाची माहिती आपल्याला मिळते..

आयातीमध्ये कोणकोणत्या वस्तूंचा समावेश होत होता? त्या वस्तू कोठून आपल्या देशात यायच्या? ही माहिती मिळते. निर्यातीच्या कोणकोणत्या वस्तू, भारतात कुठे तयार होत होत्या? त्या कोणकोणत्या देशांत निर्यात व्हायच्या ? कोणकोणत्या वाहतूक साधनांचा वापर या व्यापारासाठी व्हायचा? अंतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय) व्यापार कोणत्या मार्गाने होत असायचा? ही माहिती आपल्याला मिळते.

थोडक्यात, या काळाचा भारताचा जो आंतरराष्ट्रीय व्यापार होत असायचा आणि त्यामध्ये जी देशावरील उत्पादन केंद्र जुडली गेली होती याची अगदी वस्तुनिष्ठ स्वरुपाची माहिती आपल्याला या ग्रंथातून मिळते. बहुधा हा ग्रंथ म्हणजे एकप्रकारे भारताबरोबर व्यापार करायचे 'गाईड/हँडबुक'च होते. त्याच निश्चितच फायदा परकीय व्यापाऱ्यांना झाला असावा आज, आपण इतिहासाचे विद्यार्थी, तत्कालिन व्यापार समजून घेण्यासाठी या ग्रंथाचा वापर करतो.